Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII | ISSUE- VII | JULY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# शास्त्रीय संगीतामध्ये ठूमरीचे स्थान

**प्रा. विद्या प्र. गांवडे**
सहा. प्राध्यपिका (संगीत विभाग)
मधूकरराव पवार कला महाविद्यालय, मुर्तिजापूर

**प्रस्तावना –**

संगीत कला ही सर्व कलामध्ये श्रेष्ठ कला मानली जाते. संगीतामध्ये शास्त्रिय संगीत, सूगम संगीत, लोकसंगीत असे प्रकार आहे. शास्त्रिय संगीत बघीतल्यास त्यामध्ये वेगवेगळ्या गायन शैली बघायला मिळतात. त्यापैकी ठूमरी, टप्पा, होरी , दादरा, नाट्यसंगीत इ. शास्त्रीय संगीतात ठूमरी इ. गीत प्रकार अत्यंत लोकप्रिय असून ठूमरी गायकीच्या अंगानेच दादरा, कजरी, चैती, होरी वगैरे संगीत प्रकार गायीले जातात. ठूमरी की भारतीय शास्त्रिय संगीतामधील एक सामान्य शैली आहे. सुरवातीच्या काळात ठूमरी नृत्याशी निगडीत होती. परंतू हळूहळू ठूमरी बैठकीची ठूमरी म्हणून गायली जाऊ लागली आणि स्वतंत्र गायनाचा प्रकार म्हणून संगीत क्षेत्रात प्रवेशली. जी ठुमकते, ती ठूमरी ठूमरीचा अर्थ ठूमठूमकत चालणारी असा होतो. ठूमरी हा शब्द हिंदी मधून आलेला आहे.

**ठूमरीचा परिचय –**

ठूमरीचा उगम इ.स. 16-17 शतकात उत्तर प्रदेशातील लोक संगीतातून झाला. गंगा यमूना ह्या नद्यांच्या मधल्या प्रदेशात ठूमरीचा प्रसार झाला. ठूमरी हा शब्द ठूमकना म्हणजे एखाद्या तालावर आकर्षक अशी चाल (नृत्य) करणे या शब्दावरून बनला आहे. त्यामुळे ठूमरी मध्ये इंद्रिय ग्राह्यता हा घटक सर्वात महत्वाचा आहे. अर्थात काही ठूमऱ्या भक्तीरसप्रधान असल्या तरीपण बहूतेक ठूमऱ्या भावात्मक आणि त्यातील हीच भावपुर्णतः गायनातून दाखवणे हे मूळ उद्दीष्ट्ये असते. ठूमरी की श्रृंगार रसप्रधान असते. शब्द ठूमरीत खूप महत्वाचे असते. संगीतातून त्याचा भाव व्यक्त होतो. त्यामुळे त्याची रचना व स्थान वैशिष्ट्येपुर्ण असते. ठूमरीचे शब्द सांगीतीकता घेऊन येतात किंवा गीताचे शब्द म्हणून येत असल्याने ते साधे, सरळ सोपे असतात व मुख्यत्वा त्याचे उच्चारण सांगितीक दृष्टीकोनातून सौदर्यपुर्ण असावे अशी सर्व साधारणपणे योजना दिसते. ठूमरीतील शब्द अतिशय लडिवाळ असतात. **उदा.** – पाणी या शब्दाला पनिया असे काव्यरीतीने उच्चारले जाते. ठूमरीचे शब्द हे प्रेमात असलेल्या स्त्रिवर आधारलेले असतात. ठूमरी गाताना बोल, अंग पार महत्वाचे असतात.

**ठूमरी करीता उपयोगात येणारे ताल -**

शब्दाच्या संगीतातील विविध सौदर्यलिला शब्दाने होणारी प्रभावी अभिव्यक्ती हाच ठूमरीचा आत्मा आहे असे दिसते. ठूमरीतील लय ही अत्यंत वैशिष्टपुर्ण अशी बाब आहे. गणीती लय, मात्रांचा हिशेब असे लयकारीचे प्रकार ठूमरीत कमी प्रमाणात येतात. ठूमरी हा ठरावीक तालामध्ये गायली जाते. दिपचंदी अद्धा त्रीताल, सितारखानी, झपताल, दादरा तालात गायला जातात.

**ठूमरीची वैशिष्टये -**

1) ठूमरी ही श्रृंगाररसप्रधान अशते. प्रेम, विरह, कोमलता, भक्ती, वात्सल्य, करुणा अशा अनेकविध भावनांची रुपे ठूमरी गायकीतून व्यक्त होतात.
2) ठूमरी ही लखनौचा नवाब वाजिद शाह याच्या दरबारात वाढली, विकसीत झाली.
3) ठूमरीतील मुक्ततेमुळे रागाच्या लवचिकतेमुळे ती गाण्यास अधिक कठीण आहे. अविष्कारासाठी खुप संयम बाळगावा लागतो.
4) ठूमरी गायकीचे पाच वेगवेगळे ढंग - लखनौ ढंग, पंजाबी ढंग, पुरब अथवा बनारशी ढंग, ख्याल अंगाची ठूमरी, राजस्थानी अंगाची ठूमरी असे म्हटले जाते.
5) ठूमरी ही शब्दरसप्रधान, भावनाप्रधान असते.

6) ठूमरीचे राग विशिष्ट असतात. त्यांची ठेवणे, स्वरविस्तार पाहील्यास भावमुक्ततेला जरुरी अशा अवसर त्यात दिसतो.

उदा – पिलू, देस, खमाज, भैरवी या रागामध्ये मुक्त स्वराविष्कार व त्यानूसार भावविष्कार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

7) तरीही आपल्या कल्पना विलासानुसार इतर रागात ठूमरी पेश करणारे कलाकार आहेत. सोहोनी, शंकरा, दरबारी, जयजयवंती, देसी अशा अनेक रागात ठूमरी गायन आढळते. उदा – बडी मोतीबाई वि. रसुलाबाई, शोभा अशा गायीका.

8) थोडक्यात ठूमरी जरी ''ठूमरी जरी (semi classical) उपशास्त्रिय किंवा सूगम (light classical) म्हटली गेली तरी धृपद, धमार, रण्याल या तिन्ही प्रकारातील सौदर्यमुल्यांचा वापर त्यात मुक्ततेने करावा लागतो.

9) ठूमरी श्रृंगारप्रधान रसाची असली तरी श्रृंगाराची अनेक रुपे ठूमरीतून व्यक्त होतात. प्रेम, विरह, कोमलता, भक्ती, वात्सल्य करुणा अशा अनेकविध भावनांची रुपे ठूमरी आणि ठूमरीगायकीतून व्यक्त होतात.

10) ठूमरी या संज्ञेतच दादरा, कजरी, चैती इत्यादी किंचित जलद व अधिक शब्द प्रधान असे गानप्रकार येतात.

11) अलंकरण, त्याचे तंत्र या गोष्टीपेक्षा ठूमरीत महत्वाचा आहे तो भाव त्याच्याविणा कितीही खटके, मुरक्या, आंदोलने घेतली, तरी ठूमरीतून काही व्यक्त होत नाही. एकाच ओळीतून अथवा शब्दातून कितीतरी भाव व्यक्त करायचे असतात त्यासाठी सतत नवनवीन जागा, शब्द स्वरांची गुंफण सुचावी लागते.

12) नायिका भेदर समजणे ठूमरी गायकीसाठी आवश्यक असते. त्यासाठी वैष्णव पदावलीचा उपयोग होतो.

13) ठूमरीचे विविध बाज असतात याला पंरपरा अथवा धराणी म्हणतात. यात प्रामुख्याने बनारस, पंजाब, पतियाला के ठळक फरक आहेत. बनारस ठूमरी ही तुलनेने अधिक सख, मिड, ठेकेराव या अलंकराणे सजलेली, भारदस्त अशी आहे.

**ठुमरी गायक -**

महाराष्ट्रात ठुमरी गायीली ती वि. मेनका शिरोडकर, काही प्रमाणात केसरबाईनी आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शोभा गुर्टू माणिक वर्मा यांनी ठूमरी विपुल गायली. ठूमरी गायकीमध्ये मोलाची भर टाकून ती परंपरा लोकप्रिय करुन जगली आणि जागली ठेवण्याचे योग्य श्रेय विदुषी शोभा गुर्टूकडे जाते. याशिवाय महाराष्ट्रात उत्तम ठूमरी गाणाऱ्या काही गायीका, गायक होऊन गेले. उ बडे गुलाम अली खाँ, बरकत आली की नावे येऊन गेली आहेत. उ. फैयाज खाँ ही उत्तम ठूमरी गात असत वजेहुआ अतिशय रसिली ठूमरी गात किराणा ठूमरी विषयी खास उल्लेख अब्दुल करीम खाँ यांचा केला जातो. अ. करीम खाँ यांची ''पियाबीन नडी आवत'' की ठूमरी लोकप्रिय आहे. त्यांचे शिष्य बेकेरवूण, सवाई गंधर्व ठूमरी गात असत.

**निष्कर्ष -**

ठूमरी हा गीतप्रकार उपशास्त्रीय संगीत प्रकारामध्ये येत असला तरी तो अतिशय लोकप्रिय असा प्रकार आहे. ठूमरीमध्ये लडिवाळ असे शब्द असतात अतिशय भावपुर्ण अशी ठूमरी गायली जाते यामध्ये रायाल गायकीचा समावेश अनेक जे राग असतात त्यामध्ये ठूमरी गायली जाते. मिला रागाचा उपयोग यामध्ये होतो. त्यामुळे ती श्रोत्यांना एकणाऱ्याला खूप चांगली वाटते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1) महाराष्ट्रातील संगीत परंपरा - डॉ. शुभदा कुलकुर्णी
2) संगीत विशारद -
3) https://mr.m.wikipeida.org7.wiki
4) कलाविकार अंक 2005
5) हिन्दूस्थानी संगीत पद्धती भाग – 1 – पं.वि. ना. भातखंडे